Mula Education Society's

# Arts, Commerce and Science College

Sonai, Tal. Newasa, Dist. Ahmednagar - 414 105

Reaccredited with 'A' Grade by NAAC, Bangalore & Certified by ISO 9001 : 2015

YASH GROUP



# वर्णनात्मक भाषाविज्ञान


**Mr. Tukaram B. Jadhav**
**Assistent Professor**
**Dept. of Marathi**
**M.A. B.ed. NET**


**e- Content Development Centre**

## वर्णनात्मक भाषाविज्ञान - स्वनिमविचार –

**स्वन-स्वनिम-स्वनांतर (परस्परसंबंध व प्रकार ) :**

भाषा ही ध्वनींची बनलेली असते. आपण आपल्या वागिंद्रियाद्वारे हवे तितके आणि हवे तसे ध्वनी निर्माण करू शकतो. असंख्य ध्वनी निर्मिती करण्याची क्षमता आपल्याकडे आहे. असे असले तरी आपण वागिंद्रियाद्वारे जेवढे निर्माण करतो तेवढे च्या तेवढे ध्वनी भाषेत वापरले जात नाहीत. भाषा कोणतीही असो त्यामध्ये काही निवडक ध्वनीचाच वापर होतो, सर्व भाषेमध्ये सामान ध्वनीचा त्याच निवड ध्वनी समुदायाचा वापर केला जातो असे ही दिसत नाही तर प्रत्येक भाषेने आपल्या वापरासाठी निवडलेले ध्वनी हे वेगवेगळे असू शकतात. एका भाषेतील विशिष्ट ध्वनी दुसऱ्या भाषेत असेलच असं नाही. कधी कधी एखादा ध्वनी अनेक भाषेमध्ये आढळणे शक्य आहे, यावरून प्रत्येक भाषेत वापरणारे ध्वनी वेगवेगळे असतात.वरील विचार लक्षात घेता, आधुनिक भाषा विज्ञानामध्ये ध्वनी या संकल्पनेपासून स्वन-स्वनिम-स्वानंतर या त्रहीचा अभ्यास सुरु झालेला दिसतो. याचा अर्थ असा की, स्वनविज्ञान हे भाषेच्या अभ्यासाचे प्रमुख अंग आहे आधुनिक भाषाविज्ञानामध्ये ध्वनी या शब्दाऐवजी स्वन हा शब्द वापरला जातो.

**स्वन- संकल्पना**

डॉ. ग.ना.जोगळेकर यांनी 'अभिनव भाषाविज्ञान' या ग्रंथामध्ये स्वनाची व्याख्या केलेली आहे, ती पुढील प्रमाणे-

"जे मुखावाटे उच्चारले जातात, ज्यांचे उच्चारण मोठ्या प्रमाणात अनेकांकडून होते. जे स्वतंत्रपणे आणि एका मागोमाग एक असे उच्चारले जातात. ज्यांच्या संयोगातून शब्द बनवता येतात, असे भाषाध्वनी म्हणजे स्वन होय."

या व्याख्याचे चिकित्सक मंडन केले असता, भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनीला स्वन असे म्हणतात. भाषेमध्ये ध्वनी कडूनच काही कार्य अपेक्षिलेले असते, त्यामुळे भाषेकरिता उपयुक्त असे कार्य करु शकणारा कोणताही ध्वनी म्हणजे स्वन होय असे म्हणता येते.

ज्या ध्वनीमध्ये भाषा ध्वनीत होण्याची क्षमता नाही अर्थातच ते ध्वनी स्वन ठरत नाही, याचा अर्थ स्वनाचा विचार करताना स्वनाच्या अंगी भाषाध्वनी बनण्याची क्षमता आहे की नाही तेवढे पाहिले जाते.

**स्वनाच्या व्याख्या-**

१. भाषेत वापरला जाणारा ध्वनी म्हणजे स्वन होय.

२.भाषाध्वनीत होण्याची क्षमता असणारा लहानात लहान ध्वनीगट म्हणजे स्वन होय.

३. भाषेसाठी उपयुक्त कार्य करू शकणारा कोणताही ध्वनी म्हणजे स्वन होय.

४.स्वन म्हणजे भाषेत वापरला जाण्याची क्षमता असणारा ध्वनी.

५.मुखावाटे उच्चारला जाणारा ध्वनी म्हणजे स्वन होय.

६.स्वननिर्मिती ही विविध अवयवांची सामूहिक कृती असते.

वरील सर्व व्याख्या अभ्यासल्या असता स्वनांचे काही निकष डोळ्यात भरतात, काही लक्षणे दिसून येतात.

**स्वनाची लक्षणे** –

**१.व्यक्तिविशिष्टता -** जेव्हा आपण स्वनाचे उच्चारण करतो त्या स्वनाच्या उच्चारणा वरून त्या व्यक्तीचे वय, ती पुरुष आहे की स्त्री आहे? लहान आहे की मोठी आहे? त्या व्यक्तीची मनस्थिती कशी आहे? हे त्या स्वनाच्या उच्चारणावरून कळते, याचाच अर्थ व्यक्तीविशिष्टता हे स्वनाचे एक लक्षण आहे.

**२.विभेदकता** – दोन स्वनामध्ये भेद दिसून येतो, वेगळेपणा दिसून येतो. एक स्वन दुसऱ्या स्वनाहून वेगळा वाटतो. काटा-फाटा या उदाहरणांमध्ये क व फ हे वेगवेगळे स्वन आहेत. त्यांचे भाषेत येण्याने शब्द वेगळे बनले आहे. याचाच अर्थ असा की एक स्वन दुसऱ्या स्वनाहून वेगळा आहे. त्यांच्यामध्ये विभेदकता हे लक्षण दिसून येते.

**३.उच्चारणातील लवचिकता -** हे स्वनाचे महत्त्वपूर्ण लक्षण आहे. आपण एकच स्वन कितीही वेळेमध्ये उच्चारु शकतो म्हणजेच त्या स्वनाचे उच्चारण एकसुरी नसते. उदा. क,ख,ग,घ, हे मराठची वर्णमाला हे सर्व स्वन आहेत.

**स्वनिम संकल्पना-**

वर्णनात्मक भाषाविज्ञानामध्ये स्वन संकल्पना समजावून घेताना पहिल्यांदा ध्वनीचा विचार होतो. ध्वनीतून स्वनाची निर्मिती होते. स्वन भाषेचे कार्य करतो तेव्हा भाषेत वापरल्या जाणाऱ्या स्वनांच प्रतिनिधित्व जो करतो त्याला स्वनिम असे म्हणतात.

**स्वनिमाच्या व्याख्या** –

१.भाषेत वापरल्या जाणाऱ्या एखाद्या ध्वनीचे आजूबाजूच्या परिस्थितीमुळे ध्वनीचे उच्चारण कसे होते त्या उच्चारनाचे प्रतिनिधित्व करतो, त्याला स्वनिम असे म्हणतात.

२.ज्यांच्या मध्ये स्वनिक साम्य आहे, ज्यांच्यातील आजूबाजूच्या परिस्थितीमुळे होणारा फरक अंदाजक्षम आहे. अशा ध्वनीच्या समूहाला स्वनिम असे म्हणतात.

३.भाषा सापेक्ष असे प्रातिनिधिक आदर्श उच्चारण म्हणजे स्वनिम होय.

स्वनिम संकल्पना विचारात घेताना थोडक्यात असे म्हणता येते की, स्वन भाषेचे कार्य करतात. ते जेव्हा भाषेत प्रत्यक्ष येतात. वेगवेगळ्या ठिकाणी काम करतात. तेव्हा भाषेत प्रवाहित झालेल्या वेगवेगळ्या स्वनांचा ज्या प्रतिनिधीच्या नावाने ओळखले जाते, त्या प्रतिनिधीला स्वनिम संकल्पना असे म्हणतात.

**स्वनांतर** –

वर्णनात्मक भाषाविज्ञानामधील स्वन-स्वनिम-स्वनांतर ही त्रही स्पष्ट करीत असताना स्वन हे ध्वनीचे पहिले रूप अर्थसापेक्ष असते. स्वनिम प्रतिनिधीक रूप तर स्वनांतर म्हणजे प्रत्यक्ष व्यवहारच, स्वन भाषेचे कार्य करतात, पण ते जेव्हा भाषेमध्ये येतात तेव्हा त्यांचे रूपांतर स्वनांतर मध्ये होते. आपण भाषेमध्ये ज्यांचा वापर करतो त्यांना स्वनांतरे म्हणून ओळखतात.

**स्वनांतराची व्याख्या-**

१.'उच्चारण दृष्ट्या किंचित वेगळेपण असणारे जी भिन्न रूपे आपण भाषेत वापरतो. त्यांना स्वनांतरे असे म्हणतात.

२.'भाषेत वापरल्या जावू शकणाऱ्या ध्वनीला स्वन असे म्हणतात तर प्रत्यक्ष भाषेत वापरले जातात ते स्वनांतरे होय.

**स्वन-स्वनिम-स्वनांतर अनोन्य संबंध -**

एकाच स्वनिमांच्या गटात समाविष्ट होणाऱ्या ध्वनीना स्वनांतर म्हणतात. स्वनिम आणि स्वनांतरे यांचा एकमेकांशी असणारा संबंध हा घटक आणि घटक सभासद यांच्यातील नात्यासारखा असतो. स्वनिम ही कल्पना आहे तर स्वनांतरे ही स्वनिम कल्पनेची प्रात्यक्षिके आहेत. भाषेत स्वनिम वापरला जात नाही तर त्याची स्वनांतरे वापरले जातात.

स्वनिमाचा भाषेत वापर होताच त्याचे स्वनांतरात रूपांतर होते स्वनांतरे म्हणजे स्वनिमाची स्थितीय परिवर्तने होत. स्वनिम कल्पनेची तुलना कुटुंब कल्पनेशी करता येईल. उदा. 'काकडे' हे एक कुटुंब आहे तर काकडे कुटुंबातील सगळे माणसे विठ्ठल, रुक्मिणी, ज्ञानदेव, जनाबाई, शिवाजी, संभाजी, हे सगळी माणसे काकडे कुटुंबाचे सभासद आहेत. प्रत्यक्ष समाजात हे सभासद म्हणजे कुटुंबातील माणसे काम करीत असतात. तसेच भाषेतही स्वनांतरे कार्य करतात. स्वनांतरे हे सभासद असतात तर स्वनिम हे कुटूंब असते. स्वनिम हे कुटुंब स्वनांतरे त्याचे सभासद असा हा अनोन्य संबंध आहे.

**स्वन-स्वनिम-स्वनांतर यांचे भाषेतील लेखन** –

स्वनाचे लेखन – उदा. क, ख, ग, घ,

स्वनिमाचे लेखन – उदा. /क/,/ख/,/ग/,/घ/ अशा दोन तिरप्या रेषेत करतात तर स्वनांतराचे लेखन मात्र वर्गवारीत करावे लागते. उदा. 'ग' हा एक स्वन आहे त्याचे स्वनिम लेखन /ग/ अशा दोन तिरप्या रेषेमध्ये केले जाते. तर स्वनांतराचे लेखन कसे करावे.

स्वनांतराचे लेखन -

उदा.

/ग/ → ($ग^{१}$)
→ ($ग^{२}$)
→ ($ग^{३}$)

याचा अर्थ असा की 'ग' हा जेव्हा भाषेमध्ये येवू लागतो. उदा. गंगाधर, गौतम, गोकुळ, तेव्हा 'ग' या स्वनांचे

/ग/ → (गंगाधर) - $ग^{१}$
→ (गौतम) - $ग^{२}$
→ (गोकुळ) - $ग^{३}$

अशी स्वानंतरे दिसून येतात.

**सारांश-**

वर्णनात्मक भाषाविज्ञानामध्ये स्वन-स्वनिम-स्वनांतर ही त्रही परस्परावलंबी आहे. स्वनिम ही वर्णनात्मक भाषाविज्ञानातील महत्त्वाची संकल्पना आहे. स्वनिमविचार हा वर्णनात्मक भाषाशास्त्राचा मूळाधार आहे. भाषेत स्वनिमाची काटकसर असते.

वरील सर्व विचारांती आपल्याला असे स्पष्ट करता येते की १. भाषेत वापरला जाऊ शकणाऱ्या ध्वनीला स्वन म्हणतात आणि भाषेत प्रत्यक्ष वापरले जातात ते स्वनांतरे होय. २. स्वन म्हणजे भाषेत वापरला जाण्याची क्षमता असणारा ध्वनी त्यामुळे स्वनांचा विचार करताना कोणतीही विशिष्ट भाषा डोळ्यासमोर नसते. स्वनांतराचा विचार हा भाषा निरपेक्ष नसतोच कारण ते स्वतः भाषेत अर्थपूर्णता करतात. ३.स्वनांचा विचार म्हणजे ध्वनीची परीक्षाच, एखादा ध्वनी भाषा ध्वनीत होण्याची क्षमता आहे की नाही हे पाहूनच त्याला स्वन ठरवायचे. स्वनांतराच्या अभ्यासाची प्रक्रिया पूर्णपणे भाषा विज्ञानाच्या कक्षेतील आहे. ४. स्वनविचार सर्व भाषांच्या अभ्यासाची पायरी म्हणून उपयुक्त आहे तर स्वनांतराचा विचार हा विशिष्ट भाषेपुरताच मर्यादित असतो. स्वन-स्वनिम-स्वनांतर ही त्रही वर्णनात्मक भाषाविज्ञान यामध्ये फार महत्त्वाची मानली जाते


Thank You